लोकलेखा समिती अध्यक्ष व माजी कॅबिनेट मंत्री सुधीरभाऊ मुनगंटीवार यांचा वाढदिवस फोर्टीस रुग्णालयात साजरा...!

महाराष्ट्राचे माजी वित्त, नियोजन आणि वन मंत्री आदरणीय आ. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांचा 60 वा वाढदिवस चंद्रपूर येथील मुले आणि त्यांच्या कुटुंबीयांनी मुंबई येथील फोर्टीस रुग्णालयात साजरा केला.

दिनांक 18 जून 2022 रोजी श्री माता कन्यका सेवा संस्था चंद्रपूर द्वारा आयोजित स्व. डॉ. सच्चिदानंद मुनगंटीवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ फोर्टीज हॉस्पीटल मुंबई यांच्या विशेष सहकार्याने आयोजित बालकांच्या निःशुल्क हृदयरोग तपासणी शिबीरात जी बालके हृदयरोग शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरली ती बालके त्यांच्या पालकांसह दि. 27 जुलै रोजी मुंबईसाठी रवाना झाली होती.

या शिबिरामध्ये जन्मजात हृदयाचा त्रास असणाऱ्या एकूण पात्र 60 बालकांवर मोफत शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. त्यातील मुंबई पोहचलेल्या पहिल्या बॅच मधील सुमारे 20 बालके आणि त्यांच्या कुटुंबीयांनी या वाढदिवसाच्या कार्यक्रमात सहभाग घेतला.